**ठळक बातम्या**

- राज्यातल्या १५ रेल्वे स्थानकांसह देशभरातल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन/ बिकानेर मुंबई रेल्वे गाडीला दाखवला हिरवा झेंडा

- ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची संयुक्त अरब अमिरातीच्या मंत्र्यांशी चर्चा

- पावसाळ्यात जीवीत आणि मालमत्तेची हानी रोखण्यासाठी राज्यातल्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुटीच्या दिवसांसह २४ तास सज्ज राहावं, असे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**आणि**

- राज्याच्या विविध भागात पावसाची जोरदार हजेरी, दक्षिण कोकणाला आज पावसाचा रेड अलर्ट

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थानमध्ये बिकानेर इथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून देशातल्या १८ राज्यांमधल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं उदघाटन केलं. यात महाराष्ट्रातल्या १५ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. परेल, चिंचपोकळी, वडाळा रोड, माटुंगा ही मुंबई उपनगरीय रेल्वे स्थानकं, त्याशिवाय सावदा, लोणंद, नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन, केडगाव, लासलगाव, मूर्तिजापूर जंक्शन, देवळाली, धुळे, सावदा, चांदा फोर्ट  आणि आमगाव  या स्थानकांचा यात समावेश आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या कार्यक्रमात बिकानेर-मुंबई एक्सप्रेस गाडीला हिरवा झेंडा दाखवला. ते म्हणाले....

**होल्ड बाईट....( २३ सेकंद)**

प्रधानमंत्री मोदी यांनी सुमारे २६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण केलं. अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत देशातल्या १३०० पेक्षा जास्त रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. या स्थानकांमध्ये स्थानिक वास्तुकलेचं प्रतिबिंब दिसेल तसंच दिव्यांगजनांसाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध केल्या जातील.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं येत्या १५ दिवसांत ३२ वेगवेगळ्या देशांना भेटी देणार आहेत. खासदार **श्रीकांत शिंदे** यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आज सकाळी संयुक्त अरब अमिरातीत तिथले सलोखा विषयक विभागाचे मंत्री शेख नाहयान बिन मुबारक अल नाहयान यांच्याबरोबर चर्चा केली. या ऑपरेशन सिंदूरचा भाग म्हणून अशा प्रकारचे आयोजन करणारा युएई हा पहिलाच देश आहे.

खासदार **संजय कुमार झा** यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ देखील आज जपानला पोहोचलं. दहशतवादाच्या विरुद्धच्या लढाईत जपान भारताला दृढ पाठिंबा देईल, असा विश्वास जपानच्या नेत्यांनी व्यक्त केला.

द्रमुक खासदार **कनिमोळी करुणानिधी** यांच्या नेतृत्वाखाली तिसरं शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशिया या पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना झालं आहे. याचबरोबर खासदार बैजयंत पांडा, खासदार रविशंकर प्रसाद, खासदार शशी थरूर आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील इतर चार शिष्टमंडळं येत्या काही दिवसांत वेगवेगळ्या देशांना रवाना होतील.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ भारतीय जनता पार्टीतर्फे विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. नांदेड मधे तसंच सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या सावंतवाडी

शहरात तसंच काल भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. पाऊस कोसळत असताना सुद्धा नागरिक मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी झाले होते.

आता ऐकूया पालघर जिल्ह्यातल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया….

**होल्ड बाईट ( १ मिनिट)**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी २५ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा १२२ वा भाग असेल. नागरीकांना या कार्यक्रमासाठी आपल्या सूचना आणि विचार १८०० ११ ७८०० या नि:शुल्क क्रमांकावर २३ मे पर्यंत पाठवता येतील.

**<><><><><>**

पावसाळ्यात जीवीत आणि मालमत्तेची हानी रोखण्यासाठी राज्यातल्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुटीच्या दिवसांसह २४ तास सज्ज राहण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. ते मोसमी पावासाच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत बोलत होते.

आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद देणे महत्वाचे आहे. त्यासाठीची कार्यपद्धती योग्यरित्या राबवावी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये यंदा अधिक पावसाचा अंदाज पाहता सांगली आणि कोल्हापूर महानगरपालिकांनी विशेष तयारी ठेवावी. दरड कोसळण्याच्या जागी तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात. यात जिल्हाधिकारी यांनी प्रामुख्याने लक्ष घालावे. मुंबईत दरड प्रवण अशी एकूण २४९ ठिकाणे आहेत. याबाबत सर्वच संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात. असंही त्यांनी यावेळी सांगितलं. या आढावा बैठकीला  नौदल, वायुलद, सैन्यदल, सागरी सुरक्षा दल, एनडीआरअफ, एसडीआरएफ, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे

अधिकारी आणि सर्व संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव आदी अधिकारी आणि मंत्री, नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

मोसमी पावसाचं आगमन होण्यापूर्वीच राज्याच्या विविध भागात पावसान जोरदार हजेरी लावली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मंगळवार पासून सुरु झालेला वादळी पावसाचा जोर आजही कायम आहे काल रात्रीपासून पावसाचा जोर वाढला आहे. गेल्या २४ तासात जिल्ह्यात सरासरी ५७ मिमी पावसाची नोंद झाली. सर्वाधिक पाऊस वेंगुर्ले तालुक्यात ८० मिमी पडला. पावसामुळे अनेक ठिकाणी घर-गोठे यांची पडझड होऊन ५ लाख ७१ हजार ९५० रुपयांचं नुकसान झाल्याही माहिती आपत्ती विभागातून देण्यात आली.

दोडामार्ग तालुक्यात एकाचा वीज अंगावर पडून मृत्यू झाला. दरम्यान समुद्र खवळला असल्यान अनेक नौका सुरक्षेसाठी देवगड बंदराच्या आश्रयाला आल्या आहेत. या पावसामुळे महावितरणचं देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल आहे. काही ठिकाणी अजूनही वीज पुरवठा सुरळीत झालेला नाही. तो सुरु करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी अहोरात्र मेहनत घेत आहेत.

दरम्यान आंबोली घाटात आज सकाळी दरड कोसळल्यामुळे काल वाहतूक ठप्प झाली होती.

रत्नागिरी जिल्ह्यात पावसाची संततधार सुरूच असून, संगमेश्वरजवळ महामार्ग चौपदरीकरणाचं काम सुरू असताना माती उकरल्यामुळे काल संध्याकाळी वडाचं झाड कोसळलं आणि कसबा उच्चदाब वीजवाहिनीचे सहा खांब वाकले. त्यामुळे अनेक भागांचा विद्युतपुरवठा खंडित झाला. त्यापैकी कसबा गावाचा वीजपुरवठा इतर ठिकाणांहून वीज घेऊन काही कालावधीत सुरू करण्यात आला; मात्र मापारी मोहल्ला, कोंड असुर्डे, मौजे असुर्डे यांसह अन्य काही ठिकाणांचा वीजपुरवठा बंदच आहे. दरम्यान आज सकाळी आठ वाजता संपलेल्या २४

तासांमध्ये सर्वाधिक ८२ पूर्णांक ३३ शतांश मिलिमीटर पाऊस संगमेश्वरमध्ये पडला. या पूर्वमोसमी पावसामुळे पाणीटंचाईची तीव्रता कमी झाली असली, तरी जनजीवन विस्कळीत झालं आहे. लातूर जिल्ह्यात ऐन उन्हाळ्यात बरसत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे आणि फळबागांचे मोठं नुकसान झालं आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची ज्वारी, बाजरी आडवी झाली आहे. निलंगा तालुक्यात टरबुजाची शेती उद्ध्वस्त झाली आहे. तर आंब्याच्या फळबागांचंही मोठं नुकसान झालं आहे.

**<><><><><>**

दक्षिण कोकण किनारपट्टी जवळ अरबी समुद्रातला कमी दाबाचा पट्टा आणखी तीव्र होण्याची शक्यता असून, हवामान विभागानं दक्षिण कोकण किनारपट्टी भागाला जोरदार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. येत्या २ ते ३ दिवसांत केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची शक्यता असून, २७ मे च्या सुमाराला तो पूर्व भारतात पोहोचेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारनं ॲप आधारित टॅक्सी धोरण काल जाहीर केलं. या धोरणात चालकाचं प्रशिक्षण, भाडं आकारणी आदींचा समावेश आहे. ओला, उबर यासारख्या कंपन्यांना हे धोरण लागू असेल.

**//<><><><><>//**